# अमरावती महानगरपालिका, अमरावती

राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१ विद्युत विभाग ई-मेल:- ee1pwdamc@gmail.com


जा.क्र. अमनपा/प्रवि/ ४०१ दिनांक – ०९/०३/२०२६

## जाहीर सूचना

अमरावती महानगरपालिका क्षेत्रामधील केबल धारकांना जाहीर सूचित करण्यांत येते की, अमरावती महानगरपालिका हद्दीतील पथदिव्यांच्या खांबांवर मोठ्या प्रमाणात अनधिकृतपणे ऑप्टिकल फायबर केबल्स टाकण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. अशाप्रकारे पूर्वपरवानगीशिवाय केबल्स टाकणे हे सार्वजनिक मालमत्तेचे विद्रूपीकरण असून, यामुळे सार्वजनिक सुरक्षिततेला धोका निर्माण होत आहे तसेच महानगरपालिकेच्या देखभालीच्या कामात देखील अडथळा निर्माण होत आहे.

याबाबत अमरावती शहरातील केबल ऑपरेटर्स व सर्व्हिस प्रोव्हाइडर्स यांच्या दि. १७/०९/२०२५, दि. १४/१०/२०२५, व दि. २५/०२/२०२६ रोजीच्या बैठकींमध्ये अमरावती शहरामध्ये लोंबकळत असलेल्या व वापरात नसलेल्या केबल्स त्वरित काढण्याबाबत मा. आयुक्त यांनी सूचना दिलेल्या आहेत व रस्त्यात अस्ताव्यस्त ओढण्यात आलेले केबलची सुव्यवस्थित टॅग लाऊन करण्याचे निर्देशित केले होते जेणेकरून रस्त्यात केबलमुळे अपघात होणार नाहीत.

तथापी ज्या व्यक्ती, खाजगी कंपन्या आणि दूरसंचार सेवा पुरवठादार यांनी पूर्वपरवानगीशिवाय केबल्स पथदिव्यांच्या खांबांवर टाकले आहेत, त्यांना सूचित करण्यात येते की त्यांनी हे केबल्स सदर सूचनेच्या दिनांकापासून सात दिवसांच्या आत काढून टाकावेत.

या सूचनेचे पालन न केल्यास, सात दिवसांची मुदत संपल्यानंतर, सदर लोंबकळणारे व गुंडाळी करून बांधून ठेवलेले केबल हे डेड केबल्स समजून ते महानगरपालिकामार्फत शहरामध्ये मनपाच्या यंत्रणेद्वारे काढण्याची कार्यवाही करण्यात येईल.

सही/-

**आयुक्त**
अमरावती महानगरपालिका, अमरावती